हमेशा चुनौतियों को स्वीकार करना चाहिए इससे सफलता मिलेगी या तो शिक्षा।

दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | सोमवार १७ फेब्रुवारी २०२५ | अंक ७० ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु




# कोंबडी खाल्ल्याने महाभयंकर जीबीएसची लागण


## अजितदादांनंतर डॉक्टर भोंडवे यांनी काय दिला धोक्याचा इशारा?

### पुण्यात जीबीएसचा हाहा:कार

पुण्यात जीबीएस आतापर्यंत १२४ बाधितांना डिस्चार्ज देण्यात आला असून आज नव्याने एक रुग्ण सापडला. त्यामुळे बाधित रुग्णसंख्या २०८ वर पोहोचली असून त्यातील १८१ रूग्णांची जीबीएसचे निदान झाले आहे. पुणे शहरात दररोज जीबीएस बाधित रुग्णसंख्या वाढत आहे. मात्र रविवारी तपासणी होत नसल्यामुळे बाधित रुग्णसंख्या कमी दिसते. त्यामुळे रविवार वगळता दररोज चार ते पाच जीबीएस बाधित सापडत आहे.व्हेंटिलेटर आणि अतिदक्षता विभागात उपचार घेणा-यांची संख्याही दररोज कमी-अधिक होत आहे. दरम्यान, पुणे शहरासह पिंपरी-चिंचवड आणि ग्रामीण भागातही रुग्ण आढळत आहे. आतापर्यंत पुणे शहर आणि जिल्ह्यांत २०८ जीबीएसबाधित रुग्णांपैकी ४२ रुग्ण पुणे महापालिका कार्यक्षेत्रातील असून सर्वाधिक रुग्णसंख्या ९४ ही समाविष्ट गावांतील आहे

### महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून गुलियन बॅरी सिंड्रोम (GBS) चा प्रादुर्भाव वाढला आहे. डॉक्टरांनी दूषित अन्न आणि पाणी यांना या आजाराचे मुख्य कारण मानले आहे.

राज्यात गेल्या काही दिवसांपासून गुलियन बॅरी सिंड्रोम (GBS) या दुर्मिळ आजाराने थैमान घातले आहे. सध्या मुंबई, पुणे, ठाणे, कोल्हापूर यांसह ठिकठिकाणी जीबीएस आजाराचा धुमाकूळ पाहायला मिळत आहे. पुण्यात आतापर्यंत या आजाराचे २०८ रुग्ण आढळले आहेत. त्यातील ४२ रुग्ण हे पुणे महापालिका क्षेत्रातील आहेत. तसेच १२४ रुग्णांना डिस्चार्ज देण्यात आला आहे. यामुळे सध्या राज्यातील जनतेमध्ये भीतीचे वातावरण पसरलं आहे. आता या आजाराबद्दल डॉ. अविनाश भोंडवे यांनी धोक्याचा



इशारा दिला आहे.डॉ. अविनाश भोंडवे यांनी नुकतंच प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी ऋड आजाराबद्दल सर्व माहिती दिली. "GBSहा रोग कुठल्याही जंतूपासून किंवा बॅक्टेरिया आणि वायरस पासून होत नाही. काही विषाणू अन्नपदार्थातून आपल्या शरीरात गेल्यानंतर हा आजार जास्त होण्याची शक्यता असते. दूषित पाणी, दूषित अन्न किंवा दूषित मांसाहार या कारणामुळे ऋड आजार होतो, हे निष्पन्न झालं आहेङ्ग, असे डॉ. अविनाश भोंडवे म्हणाले.केवळ मांसाहार खाल्ल्यानेच जीबीएस होतो, असं बोलणं वावगं ठरेल. काही अंशी ते खरं देखील आहे. दूषित मांस किंवा उघड्यावरचे अन्न खाणे टाळा. जीबीएस होऊ नये म्हणून केवळ शिजवलेलं मांस खा. जर जीबीएसचा जिवाणू कोंबड्यांमध्ये असेल तरच माणसाला याची लागण होऊ शकते. प्रत्येक कोंबडी खाणा-याला याची लागण होईल असं नाही. GBS विषाणूमुळे प्रत्येक व्यक्तीला हा आजार होईल असं नाही असेही डॉ. अविनाश भोंडवेंनी म्हटले.तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जीबीएस आजाराबद्दल भाष्य केले आहे. कोंबड्याचं मांस खाल्याने हे झालं असल्याचं आता समोर येतं आहे. पाण्यामुळे आजार वाढला, अशी चर्चा आहे. त्यामुळे मांस हे पूर्ण शिजवून खाल्लं पाहिजे, असे अजित पवार म्हणाले. तर धुळे शहरामध्ये जीबीएस या आजाराचा पहिला रुग्ण आढळला आहे. ४८ वर्षीय या पुरुष रुग्णावर सध्या श्री भाऊसाहेब हिरे वैद्यकीय महाविद्यालयामध्ये उपचार सुरू आहेत. काही दिवसापासून या रुग्णाला त्रास होत असल्याकारणाने त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. तपासअंती जीबीएस आजार झाल्याचे स्पष्ट झालं. सध्या या रुग्णाची प्रकृती स्थिर असल्याची माहिती रुग्ण प्रशासनाने दिली आहे.

## नव्या दमाने संभाजी ब्रिगेड सक्षम होनार-ॲड मनोज आरवरे



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट
नांदेड : उद्याच्या नव्या महाराष्ट्राचा चेहरा मोहरा बदलायचा असेल तर प्रथम संभाजी ब्रिगेड मध्ये अमुलाग्र बदल घडवून काही प्रमाणात धोरणात्मक निर्णय घेऊन तर राज्य पातळीवरील पदाधिका-यांसह तालुका पातळीवरही पुनर्गठन करून नव्या दमाच्या उमेदीच्या कार्यकर्त्यांवर विश्वास टाकून नव्या दमाने संभाजी ब्रिगेड आणखी सक्षम करुयात असा शिवनिर्धार संभाजी ब्रिगेड अध्यक्ष ॲड.मनोज आखरे यांनी नांदेड विभागीय महाबैठकीत व्यक्त केला.संपुर्ण महाराष्ट्रभर संभाजी ब्रिगेड सक्षमीकरणासाठी काढण्यात आलेल्या झंझावाती. महादौरा समारोप प्रसंगी ते बोलत होते. प्रदेश संघटक,नांदेड संपर्क प्रमुख उमाकांत उफाडे यांनी कार्यकर्त्यांना सविस्तर मार्गदर्शन केले.

## तब्बल २८ वर्षांनी पुन्हा भरला दहावीचा वर्ग!

### जय भवानी महाविद्यालयात १९९६ च्या बॅचचे स्नेहमिलन

गेवराई, गढी येथील जय भवानी महाविद्यालयात १९९६ मध्ये दहावी परिक्षा उत्तीर्ण झालेल्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा पार पडला. हे विद्यार्थी तब्बल २८ वर्षानंतर एकत्र आले होते. यानिमित्त आयोजीत कार्यक्रमात गुरुजनांचा सत्कार करत आठवणींना उजाळा देण्यात आला.जयभवानी म हाविद्यालयात आयोजीत या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी प्राचार्य वसंत राठोड हे होते. यावेळी माजी प्राचार्य श्रीमती नागणे , शेख सर, के.पी. ढाकणे, खामकर, दराडे,



जरांगे, राठोड , बारगजे, बोर्डे, ढेरे, नाटकर, काकडे, श्रीमती लोमटे, श्रीमती दाभाडे, श्रीमती मुंढे तसेच बंडू बारगजे हे देखील उपस्थित होते. दिपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. माजी विद्यार्थ्यांच्या वतीने सर्व गुरुजनांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित माजी विद्यार्थ्यांनी शाळेने दिलेल्या शिदोरीवरच आमचे मार्गक्रमण सुरु असून शिक्षकांनी दिलेले धडे आयुष्यात पदोपदी उपयोगी पडत असल्याचे सांगितले. सुत्रसंचलन मनिषा आव्हाड यांनी केले. माजी विद्यार्थ्यांकडून शाळेसाठी कपाट देखील भेट देण्यात आले.
माजी विद्यार्थ्यांचा हा मेळावा यशस्वी करण्यासाठी मेघा नागरगोजे, आम्रपाली निसर्गंध, रोहिणी कुलकर्णी, नवल कुमार ढाकणे, दीपक दुधाळ, दीपक बोर्डे, सचिन ढेरे, विष्णू घोंगडे , आशा अलगुडे, ज्योती शिंदे तसेच पुष्पा नागरगोजे यांनी सहकार्य केले. स्नेहभोजनानंतर वंदे म ारतमब गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## आपला परिवाराच्या मनीषा पवार यांचा देहदानाचा संकल्प

बीड (प्रतिनिधी) जिवंतपणी सामाजिक कार्यात योगदान दिले. मात्र मरणानंतरही देहाचा उपयोग समाजासाठी व्हावा या उदात्त हेतूने नेकनूर येथील आपला परिवारच्या संचालक मनीषा पवार यांनी देहदानाचा संकल्प केला आहे. ज्येष्ठ समाजसेविका विना गोरवले यांच्या वाढदिवसानिमित्त पवार यांनी हा संकल्प केला आहे.



या संबंधीचे प्रतिज्ञापत्र १० फेब्रुवारी रोजी अंबाजोगाईच्या स्वा.ती.ग्रा. शा.वै.म.शरीर रचना शास्त्र विभाग प्रमुखांच्या सहीनिशी मनिषा पवार यांना दिले आहे. ज्येष्ठ समाजसेविका विना गोरवले या आर्टिस्ट्री संस्थेच्या माध्यमातून सामाजिक संस्थांसाठी मोठे काम करत आहेत. पुणे मुंबई व ठाणे येथे विविध विषयात काम करणाऱ्या सामाजिक संस्थांना सहाय्य करण्यासाठी ङ्गदेणे समाजाचेफ हा उपक्रम गेल्या वीस वर्षांपासून चालवत आहेत. या माध्यमातून निमशहरी,ग्रामीण दुर्गम व अतिदुर्गम भागातील सामाजिक संस्थांना मदत करणे हा मुख्य उद्देश असतो. ८ जानेवारीला त्यांचा वाढदिवस झाला. याचे औचित्य साधून ७ जानेवारी रोजी मनिषा पवार यांनी देहदानाचा फॉर्म भरून दिला होता.

## शिवजन्मोत्सव सोहळ्यानिमित्त बजरंग बली प्रतिष्ठान द्वारा चित्रकला स्पर्धा संपन्न

### बजरंग बली प्रतिष्ठानच्या चित्रकला स्पर्धेत विद्यार्थ्यांचा उत्साह..





बीड प्रतिनिधी - अखंड महाराष्ट्राचे दैवत असणारे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त बजरंग बली प्रतिष्ठान द्वारा शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती ही स्पर्धा दिनांक १५ फेब्रुवारी २०२५ रोजी संपन्न झाली. चित्रकला स्पर्धा तिप्पटवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मुर्शदपुर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, लिंबा रुई जिल्हा परिषद प्राथमिक शाळा या शाळेतील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभागी झाले होते. अतिशय आनंदामध्ये ही चित्रकला स्पर्धा संपन्न झाली. कोणत्याही स्पर्धेमध्ये विद्यार्थी आवडीने सहभाग घेतात. यावेळी या स्पर्धेमध्ये चित्रकलेचे विषय होते छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ, शिवसृष्टी, गड किल्ले प्रतापगड, रायगड, सिंधुदुर्ग या किल्ला पैकीच एक किल्ल्याचे चित्र काढायचे होते. अतिशय छान असे या मुलांनी चित्र काढले. कोणी रायगड किल्ल्याचे चित्र काढले तर कोणी सिंधुदुर्ग तर कोणी प्रतापगड तर कोणी छत्रपती शिवाजी महाराजांचं हुबेहूब दिसणारे चित्र काढले. अतिशय छानपणे या चित्रकले स्पर्धेमध्ये चिमुकल्यांनी भाग घेतला होता. या स्पर्धेमधील प्रथम क्रमांक येणा-या १५५५ रुपये तर द्वितीय येणा-यास १११९ रुपये , तर तृतीय येणा-यास ७७७ रुपये बक्षीस देण्यात आले आहे. या स्पर्धेचे आयोजन किरण नारायण भगत संस्थापक अध्यक्ष बजरंग बली प्रतिष्ठान तसेच बजरंग बली प्रतिष्ठान बीड मावळा प्रतिष्ठान बीड जिल्हा यांच्यावतीने करण्यात आले होते.

## पवनचक्की कंपन्यांचा मनमानी कारभार

बीड तालुक्यातील बालाघाटावर पवन ऊर्जा प्रकल्प कंपन्या संच उभारताना नियम व अटींचे पालन करत नसुन मनमानी कारभार करत आहेत.त्यामुळे पवन ऊर्जा प्रकल्प संदर्भात जमीन खरेदी व्यवहारात गैरप्रकार तसेच संपादीत जमिनीपेक्षा जास्तीचे अतिक्रमण करणे, ठरलेला जमिनीचा मोबदला देण्यास टाळाटाळ करणे,कराराचे पालन न करणे आणि जाब विचारला असता शेतकऱ्यांना दमदाटी करणे आदी प्रकारच्या शेतकऱ्यांच्या तक्रारी वाढल्या आहेत.त्यातच



आता शेतकऱ्यांच्या सहमती विना परवाना कोणाताही मोबदला न देताच शेत जमीनीमधुन गट क्रमांक ६५७ मधील ६२ आर शेतजमीनी मधुन रिन्यु ग्रीन एम.एच.पी.वन प्रायव्हेट लिमिटेड नवी दिल्ली ही कंपनी पवनचक्की उभारणी करत असुन कंपनीने दि.९ फेब्रुवारी पासून आमच्या शेत जमीनीमधुन माझ्या कुटुंबाच्या संहमतीशिवाय पवनचक्की प्रकल्प उभारण्यासाठी पोकलेन, जेसीबी, जीप,पिक अप अशा विविध वाहनांची वाहतूक करत असुन हे नियमबाह्य व माझ्या शेतजमीनीचे नुकसान करणारे आहे.त्यामुळे सदरील कंपनीस माझ्या शेतातुन वाहतूक करण्यास प्रतिबंध करण्यात यावा अशी लेखी तक्रार रोहित सुरेश ढास यांनी जिल्हाधिकारी व पोलिस अधिक्षक बीड यांना केली आहे.

# जिल्हा वाहतुक शाखेची उल्लेखनीय कामगिरी

# वेलडन जिल्हा वाहतुक पोलीस

## चोरीचे वाहन २४ तासाच्या आत सापडून दिले आरोपीला केले शिवाजीनगर पोलीसांच्या स्वाधीन

बीड (प्रतिनिधी)- शहरात सद्यस्थितीला पोलीस अधिक्षक नवनीत कावत, अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष सानप यांच्या सहकार्याने सध्या वाहतुकीचे नियम मोडर्णायांवर पोलीसांनी चांगलीच कार्यवाही सुरु केली असून गेल्या आठवड्यातच २०० रिक्षाचालकांवर दंडात्मक स्वरुपाची कार्यवाही केली होती त्यामुळे रिक्षाचालकांना देखील वाहतुकीच्या नियम मोडल्यामुळे तसेच कागदपत्रे नसल्याने कार्यवाहीचा चांगलाच दणका बसला होता.दि.१५ फ ेब्रुवारी २०२५ रोजी विशाल संजय कुलकर्णी (रा.आदित्य नगर, बीड) यांची मोटारसायकल २४ तासाच्या आत सापडून देण्याची उल्लेखनिय कामगिरी जिल्हा वाहतुक शाखेने केली आहे त्यामुळे नागरिकांत पोलीसांच्या कामगिरीविषयी सम ाधान व्यक्त होत आहे.



याबाबत माहिती अशी की, दि.१५ फेब्रुवारी २०२५ रोजी विशाल संजय कुलकर्णी (रा.आदित्य नगरी, बीड) यांची मोटारसायकल काल शनिवार रोजी अज्ञात चोराने चोरुन नेली होती ती मोटारसायकल जिल्हा वाहतुक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर, वसुदेव मिसाळ, बजरंग कुटुंबरे, सोबत पोलीस हवालदार राजाभाऊ तांदळे, महिला पोलीस शिपाई अनिता पवार, पोलीस हवालदार नितीन शिंदे, विष्णु काकडे, पोलीस नाईक अजिनाथ मुंडे, पोलीस कॉन्स्टेबल वसीम शेख व चालक पोलीस हवालदार हरके यांच्या टीमने शहरातील साठे चौकात वाहतुक नियमांचे उल्लंघन करत असतांना सदरील संशयित म ोटारचालक सुनिल गणपत शिंदे (रा. वासनवाडी) यास पोलीसांनी पकडले व त्याच्यावर दंडात्मक कारवाई करत असतांना डिवायएसवर मुळ मालक यांचा मोबाईल नंबर मिळाला त्यांना भ्रमणध्वनीवर संपर्क केला असता त्यांनी सांगितले की कालच माझे वाहन चोरीला गेले याबाबत मी शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिलेली आहे त्यानंतर सदरील वाहतुक शाखेच्या पोलीस अधिकारी आणि कर्मचार्यांनी चोरीची पडताळणी करत पुष्टी केली व आरोपीस पोलीस स्टेशन शिवाजीनगर यांच्या ताब्यात दिले. यामुळे वाहन चोरी करणार्या आरोपींचे चांगलेच धाबे दणाणले असून नागरिकांतून पोलीसांविषयी समाधान व्यक्त केले जात आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
सोमवार १७ फेब्रुवारी २०२५
https://lokaarambh.com



संपादकीय

# नरेंद्र मोदींचा अमेरिका दौरा

डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेच्या अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर अवैध निर्वासितांच्या पाठवणीपासून आयातशुल्क वाढविण्यापर्यंतच्या निर्णयांचा धडाका लावलेला असताना आणि त्याची भारताला झळ पोहोचलेली असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी वॉशिंग्टनमध्ये पोहोचले आहेत. पंतप्रधान झाल्यानंतरचा त्यांचा हा दहावा दौरा; आणि अध्यक्ष ट्रम्प यांच्या कार्यकाळातील चौथा दौरा. अमेरिकेबरोबरील संबंध अधिक मधुर व्हावेत यासाठीचा मोदींचा प्राधान्यक्रम यातून दिसतो. त्यांच्या या प्रयत्नांना यशही येताना दिसत आहे. बराक ओबामा, ट्रम्प आणि बायडेन यांच्या कार्यकाळात त्याचे प्रत्यंतर आले होतेच. मोदी आणि ट्रम्प हे स्वतःला एकमेकांचे चांगले मित्र मानतात. त्यामुळे अमेरिकेबरोबरील संबंध वृद्धिंगत होण्याची चढती कमान कायम राहायला खरे तर हरकत नाही; परंतु ट्रम्प यांच्या ङ्गअमेरिका प्रथमम या धोरणाचा आणि व्यापारयुद्धाचा फटका भारतअमेरिका संबंधांना बसण्याची शक्यता वर्तविली जात आहे. त्यातच अमेरिकेतील बेकायदा भारतीयांची परतपाठवणी आणि मोदी यांना भेटण्याच्या आधीच ट्रम्प यांनी ङ्गजशास तसेफ आयातशुल्क (रेसिप्रोकल टेरिफ) आकारण्याची केलेली घोषणा यांमुळे ती अधोरेखितही झाली. मोदी आणि ट्रम्प यांच्यातील चर्चा या पार्श्वभूमीवर अतिशय महत्त्वाची ठरते. ताज्या भेटीत दोन्ही नेत्यांची देहबोली सकारात्मक होती. ट्रम्प यांचे ङ्गअमेरिका प्रथमम हे धोरण त्या देशासाठी योग्य असल्याचे नमूद करतानाच मोदी यांनी आपणही भारतासाठी हेच धोरण राबवीत असल्याचे सांगून, द्विपक्षीय चर्चेची चौकटच एक प्रकारे स्पष्ट केली. विविध क्षेत्रांतील सहकार्य वाढविण्यासाठी त्यांच्यातील चर्चा पाहता, भारत-अमेरिका संबंधांचा आलेख चढा राहण्यासाठीचे पाऊल पडले, असे म्हणता येईल. मात्र, त्यासाठी कृती होणे आवश्यक आहे. दोन्ही देशांमधील व्यापार २०३०पर्यंत पाचशे अब्ज डॉलरपर्यंत वाढविण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट मोदी आणि ट्रम्प यांनी ठेवले आहे. उभय देशांतील सध्याचा व्यापार पुढील पाच वर्षांत चौपटीने वाढविण्याचे आव्हान कसे पेलले जाते हे पाहावे लागेल. परराष्ट्र व्यापाराबाबत अमेरिकेबरोबरील आयात-निर्यात भारतात पहिल्या स्थानी आहे; अमेरिकेच्या परराष्ट्र व्यापारात भारत दहाव्या स्थानी आहे. भारताच्या तुलनेत अमेरिकेची आयात अधिक आहे. भारताबरोबरील व्यापारतूट वाढत असल्याचा उल्लेख अमेरिकेत सातत्याने केला जात आहे. आयातशुल्क वाढविण्याचे ट्रम्प यांचे धोरण याबाबतीत महत्त्वाचे ठरते. सर्व देशांबरोबरील आपली शुल्करचना ङ्गजशास तशीफ ठेवण्याचे त्यांची ताजी घोषणा भारताला नुकसान पोहोचवू शकते. त्याची अंमलबजावणी एप्रिलपासून होणार असल्याचे म्हटले गेले आहे. या वर्षाच्या उत्तरार्धात ट्रम्प भारताच्या दौऱ्यावर येतील तेव्हा दोन्ही देशांमधील व्यापार कराराला मूर्त स्वरूप येईल. पोलाद आणि ल्युमिनियम यांच्या आयातीवर २५ टक्के शुल्क आकारण्याचा निर्णयही भारताला फटका देणारा आहे. या साऱ्यांबाबतचे अंतिम चित्र ट्रम्प यांच्या भारतदौऱ्यानंतर स्पष्ट होईल. संरक्षणाच्या बाबतीत दोन्ही देशांनी दहा वर्षांची चौकट स्पष्ट केली आहे. रणगाडाविरोधी क्षेपणास्त्रांपासून नाविक टेहाळणी विमान भारताला मिळण्यापर्यंतचे करार होणार आहेत. अवकाश, हवाई व सागरी संरक्षण, क्षेपणास्त्र यांबाबत सहकार्य वाढविण्याच्या दिशेने पावले टाकली गेली आहेत. बेकायदा निर्वासितांचा मुद्दा कोणीही अमान्य करणार नाही. अवैधरीत्या आलेल्या निर्वासितांच्या प्रश्नांना अमेरिकाच नव्हे, तर भारतही सामोरा जात आहे. मूळ प्रश्न बेकायदा निर्वासितांचा नसून, त्यांना घुसवणाऱ्या गुन्हेगारी साखळीचा आहे. त्यावर प्रहार व्हायला हवा. वैधपणे अमेरिकेत जाणारे भारतीय संशोधक, तंत्रज्ञ आणि व्यावसायिक यांचे महत्त्व अमेरिका जाणून आहे. त्यांच्यामुळे अमेरिकेला होणाऱ्या लाभाचा उल्लेखही केला जातो. अशांसाठीचे व्हिसा धोरण लवचीक असायला हवे. त्याबाबत अमेरिका कितपत सकारात्मक राहील, हे पाहावे लागेल. अध्यक्षपदी कोणीही असले, तरी भारताबाबत अमेरिकेच्या धोरणांत काही वर्षांत सातत्य राहिले आहे. हे सातत्य ट्रम्प टिकवतात की त्यात खंड पाडतात, हा प्रश्न आजही आहे. चीनविरोधी आघाडीच्या ङ्गक्वाडफ परिषदेसाठी ते भारतात येणार असल्याने; तसेच मोदींच्या भेटीत आश्वासकता दाखविल्याने धोरणसातत्य राहण्याची शक्यता वाढली आहे. मात्र, त्यासाठी दोन्ही देशांना अधिक प्रयत्न करावे लागतील. शीर्षस्थ नेत्यांना देहबोलीपलीकडे जाऊन कृती करावी लागेल

# शासकीय शिवजयंती तिथीनुसार साजरी व्हावी !


भारतीय संस्कृतीत वाढदिवस हिंदू कालगणनेनुसार म्हणजेच तिथीनुसार साजरे करण्याची प्रथा पूर्वापार चालत आली आहे. आजही अनेक घरांत पिढ्यानपिढ्या ही प्रथा जपली जात आहे. बदललेली शिक्षणपद्धती, इंग्रजी भाषेला दिले गेलेले अवास्तव महत्व, तरुणवर्गावर पाश्च्यात्य संस्कृतीचा वाढता प्रभाव आणि त्याअनुषंगाने बदलत गेलेले राहणीमान यांमुळे दैनंदिन जीवनात तिथीचा वापर करणे हळूहळू कमी होत गेले. आजमितीला तिथीचा उल्लेख केवळ लग्नपत्रिकांवरच पाहायला मिळतो. या भारतभूमीत होऊन गेलेले देवतांचे अवतार, संत महात्मे यांचे प्रकटदिन, जयंती आणि पुण्यतिथी हे आजही तिथीनुसारच साजरे केले जातात, मकर संक्रांत वगळता हिंदू धर्मातील समस्त सण-उत्सवही तिथीवरच आधारित आहेत. या महाराष्ट्रभूमीत जन्माला येऊन साऱ्या विश्वाला आदर्श राज्यकारभाराचा गुरु मंत्र देणारे, आपल्या अतुल पराक्रमाने, अचाट बुद्धिचातुर्याने, कुशल रणकौशल्याने आणि प्रबळ इच्छाशक्तीने शून्यातून स्वराज्य निर्माण करणारे युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज महाराष्ट्रातील जनतेसाठी अवताराहून कमी नाहीत त्यामुळे त्यांचा जन्मदिन तिथीनुसारच साजरा व्हावा यासाठी अनेक संघटना, संस्था आणि इतिहासप्रेमी आग्रही आहेत. समाज ऐक्यासाठी आणि लोकजागरणासाठी लोकमान्य टिळकांनी शिवजयंती सुरु केली तीही तिथीनुसारच. मात्र त्या काळापासून छत्रपती शिवरायांच्या जन्मतिथीबाबत बराच घोळ आहे. शिवरायांची जन्मतिथी इतिहासकालीन अनेक पुराव्यांमध्ये वेगवेगळी असल्याचे दिसून येते. शिवरायांच्या जन्मतिथीचा हा वाद १०० वर्षांहून अधिक काळ सुरु होता अखेर महाराष्ट्र शासनाने शिवजयंतीची तारीख निश्चित करण्यासाठी एक समिती स्थापन केली. २००१ साली या समितीने इतिहासकालीन दस्तावेज आणि इतिहासतज्ञांचे मत विचारात घेऊन शिवाजी महाराजांची जयंती म्हणून फाल्गुन वद्य तृतीया शके १५५१ म्हणजेच १९ फेब्रुवारी १६३० या तारखेवर शिक्कामोर्तब केले. या तारखेबाबतही एक घोळ झाला आहे. फाल्गुन वद्य तृतीया शके १५५१ या तिथीला अनुसरून निश्चित केलेली १९ फेब्रुवारी ही तारिख ज्युलियन कॅलेंडरनुसार आहे. ज्युलियन कॅलेंडर आता कालबाह्य झाले असून सध्याची इंग्रजी कालगणना ही ग्रेगेरिअन कॅलेंडरनुसार प्रचलित आहे. ग्रेगेरिअन कॅलेंडरनुसार फाल्गुन वद्य तृतीया शके १५५१ या तिथीला १ मार्च १६३० ही इंग्रजी तारीख येते. १९ फेब्रुवारी ही तारिख राज्यशासनाने गठीत केलेल्या समितीने निश्चित केल्यामुळे सध्या शासकीय शिवजयंती १९ फेब्रुवारीलाच साजरी केली जाते. शासनाने जरी शिवजयंती १९ फेब्रुवारीला साजरी करण्याचे निश्चित केले असले, तरी राज्यातील बहुतांश भागात आजही शिवजयंती तिथीनुसार साजरी केली जाते. छत्रपती शिवाजी महाराज भारतातील असे एकमेव राजे असावेत ज्यांची जयंती दरवर्षी इंग्रजी तारखेप्रमाणे आणि हिंदू कालगणनेनुसार तितक्याच जल्लोषात साजरी केली जाते. ज्या शिवरायांनी आपले अखंड आयुष्य हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेसाठी वेचले त्यांची जयंती ख्रिस्ती कालगणनेनुसार साजरी व्हावी हे खरेतर मनाला खटकणारे आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करतांना परकीय कालगणना झिडकारून ङ्गराज्याभिषेक शकफ ही स्वकीय कालगणना चालू केली. परकीय चलनाचा वापर थांबवून स्वकीय चलनाची निर्मिती केली. इतकेच नव्हे, तर परकीय भाषा, संस्कृती, आणि तिची प्रतिके झुगारून स्वकीय भाषेत राज्यकारभार केला, स्वसंस्कृतीचे रक्षण केले. मराठी भाषेच्या शुद्धीकरणासाठी शिवरायांनी केलेल्या प्रयत्नांची इतिहासात सविस्तर नोंद आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे प्रत्यक्ष देव किंवा अवतार नसले, तरी त्यांच्यामुळे हिंदूंच्या मंदिरातील देव शाबूत राहिले, त्यामुळे हिंदूंना ते देवाच्या स्थानी आहेत. प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी दाखवलेले अफाट शौर्य हे अवतारी कार्याहून कमी नाही, त्यामुळे हिंदूंना ते रामकृष्णादी अवतारांप्रमाणेच पूजनीय आहेत. शिवजयंती देव, अवतार आणि संत यांच्याप्रमाणे तिथीनुसार म्हणजेच फाल्गुन वद्य तृतियेला साजरी केली जावी ही मागणी गेली अनेक वर्षे शिवप्रेमींकडून लावून धरली जात आहे. आजमितीला शिवजयंती केवळ राज्याच्या सीमेपुरती मर्यादित राहिलेली नाही. साता समुद्रापार ज्या ज्या ठिकाणी मराठी नागरिक बहुसंख्येने आहेत त्या ठिकाणी शिवजयंती जल्लोषात साजरी केली जाते त्यामुळे ती इंग्रजी तारखेनुसार साजरी व्हायला हवी असे मत राज्याने गठीत केलेल्या समितीतील काही सदस्यांनी व्यक्त केले होते. खरेतर केवळ शिवजयंतीच नव्हे तर गणेशोत्सव, दिवाळी, होळी यांसारखे सण आणि उत्सव भारतीय नागरिक ज्या ज्या देशांत आहेत त्या त्या ठिकाणी प्रतिवर्षी उत्साहाने साजरे केले जातात. हे सारे सण तिथीनुसार साजरे होऊ शकतात मग शिवजयंतीच्या बाबतीत इंग्रजी तारखेचा अट्टाहास संयुक्तिक वाटत नाही. आज राज्यावर शिवसेना आणि भाजप या शिवप्रेमी आणि हिंदुत्ववादी पक्षांचे शासन आहे. शिवसेनेच्या स्थापनेपासून पक्षाच्या शाखाशाखांतून शिवजयंती उत्सव हे तिथीनुसारच साजरे करण्यात आले आणि यापुढेही ते तिथीप्रमाणेच साजरे केले जातील यात शंका नाही. याआधीही भाजपसोबत सत्तेत असताना शिवजयंती तिथीप्रमाणे साजरी करण्याचा आग्रह शिवसेनेने धरला होता. शिवप्रेमींच्या मागणीखातर गड किल्यांवरील अतिक्रमणाच्या विरोधात कठोर भूमिका घेणाऱ्या माननीय मुख्यमंत्र्यांनी शिवप्रेमींची अनेक वर्षे प्रलंबित असलेली ही मागाणीसुद्धा पूर्ण कर



जगन घाणेकर
मु.पो.घाटकोपर, मुंबई
मो.९६६४५५९७८०

# छावा चित्रपट अप्रतिम ! करमुक्त व्हावा

आज सकाळीच छावा चित्रपटाचा पहिला शो पाहून आलो. स्वराज्याचे दुसरे छत्रपती, परमप्रतापी, धर्मवीर, स्वराज्य रक्षक संभाजी महाराज यांच्या पराक्रमावर, शौर्यावर, बलिदानावर चित्रपट येतो आहे याची आणि संभाजी महाराजांच्या आयुष्यात नक्की काय घडले ते कसे दाखवणार याची प्रचंड उत्कंठा गेल्या पंधरा दिवसापासून प्रेक्षकांना होतीच. भल्या पहाटे मला प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद दिसला. या भारतभूमीची रक्षा करणाऱ्या हिमालयाची उंची या चित्रपटातून छत्रपती संभाजी महाराजांना लाभली असेच म्हणायला हवे. स्वराज्य म्हणजे काय ? मराठा म्हणजे काय ? महाराष्ट्र ममहाफम्हणजे काय ? स्वराज्यात संभाजी महाराजांच्या आयुष्यात काय घडले? संभाजी महाराजांनी कशासाठी बलिदान दिले? या प्रश्नांची उत्तरे देशवासियांना हा चित्रपट पाहून समजतील. सुरुवातीपासून म्हणजे बुऱ्हाणपूरच्या लढाईपासून हा चित्रपट आपला ताबा घेतो. पुढे उत्कंठा वाढवत मन घट्ट करायला लावतो आणि शेवटी डोळ्यातून अश्रू ओघळवायला लावतो. चित्रपट निशब्द करतो. चित्रपटातील भव्यता, व्यापकता, लढाई, शौर्य आणि कौर्य त्याचबरोबर हळवे दृश्य सर्वच सर्व अप्रतिम उठवले आहे. देशभरातल्या इतर प्रांतातील अमराठी भाषिकांना ज्यांना फक्त छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास माहिती आहे आणि ज्यांना संभाजी महाराजांच्या बलिदानाचा इतिहास माहित नाही त्यांना १७ व्या शतकातील मराठा साम्राज्याचा इतिहास समजेल अशी मांडणी उत्तमरीत्या केली आहे. गनिमी काव्याने किंवा बेदरकारपणे मरणाला न घाबरता मराठा योद्धा लढण्यासाठी कसा सिद्ध होतो हे ऍक्शन दृश्यांद्वारे दाखवले आहे. गोरिला युद्ध तंत्र हे भारतीय चित्रपटांत चित्रपटातून दाखवले नव्हते, ते वेगवेगळ्या प्रकारच्या प्रसंगात म्हणजे जमिनीवरचे युद्ध, पाण्यातील युद्ध, अग्नीचा वापर करून आणि हवेतून उड्या मारून अप्रतिमपणे चित्रित केले आहे. वकी कौशलच्या आयुष्यातील ही अप्रतिम फिल्म ठरावी. त्याच्या नजरेतील आग आणि त्याची हर हर महादेवची गर्जना टॉकीजमध्ये ऊर्जा निर्माण करते. विकी कौशलने खूप जीव ओतून काम केलेय. शेर शिवाजी का छावा जखमी झाल्यानंतर कसा थरकाप उडवतो ते रोमांच पाहताना आणि




ऐकताना रौद्र रूप अनुभवायला मिळते. रश्मीका मंदाना सोज्वळ तितकीच कणखर मराठा स्त्रीची भूमिका समर्थपणे निभावताना दिसली. औरंगजेबाची भूमिका करताना अक्षय खन्ना यांची अस्वस्थपणे थरथणारी देहबोली, चालतानाची हतबलता, ओठांची हालचाल, भेदक कट्टरपणा आणि वृद्धत्वाकडे झुकलेला त्याला केलेला साजेसा मेकअप साक्षात टोप्या विणणारा पाताळयंत्री औरंगजेब असाच असावा याचा भास होतो. अक्षयच्या आयुष्यातील सुद्धा अभिनयाची उंची गाठणारी ही भूमिका असावी. संभाजी महाराजांचेच नातलग गणोजी आणि राणोजी शिर्के यांनी फितुरी केल्यानंतर संभाजी राजांना संगमेश्वरला पकडले जाते. त्यापूर्वीची घनघोर लढाई पडद्यावर नव्हे तर प्रत्यक्ष रणांगणावरच पाहतो आहोत असे वाटते. संभाजी महाराजांचे लढाईतले प्राविण्य आणि शस्त्र-अस्त्रांचा सफाईने केलेला वापर कुठेही नकली वाटत नाही. पकडल्यानंतर ४० दिवस अतोनात अत्याचार केले जातात. साखळदंडमध्ये जखडलेल्या अवस्थेत उभ्या उभ्या प्राण सोडताना जेव्हा संभाजी महाराज मआईसाहेबफ बोलतात तेव्हा आपण गहिवरतो, लटपटतो आणि संतापून रक्त खवळते. इतके परिणामकारक दृश्य दिग्दर्शक उतेकरांनी उभे केले आहे काळालाही दरदरून घाम फोडणारा हा नृसिंह शिवप्रभूंच्या छावा हातापायात साखळदंड बांधलेला असतानाही या छाव्याला कुणी जखडून ठेऊ शकत नाही हा प्रसंग संभाजी महाराजांची अचाट ताकद दाखवतो. शरणांगत होण्यासाठी जखमेवर मीठ चोळले जाते, नखे उपटली जातात, जीभही उपटली जाते. आणि औरंग्यासमोर कधीही न झुकणारी नजर कायमची बंद करण्यासाठी डोळेही काढले जातात हे सर्व पाहताना पडद्यावरची कळ आणि त्यांच्या तोंडून उमटणारा जगदंब हे शब्द प्रेक्षकांच्या हृदयात खोलवर घुसतात. हे दुर्दैवी प्रसंग काळजावर दगड ठेवून बघावे लागतात. या वेदनेसह भलमोठं दुःख घेऊन आपल्याला चित्रपटगृहाबाहेर पडावे लागते. शेवटची २५ मिनिटे खूपच अस्वस्थ करून जातात. पडद्यावरील यातना पाहाताना आपल्याला सहन होत नाहीत, राजांनी त्या कशा सहन केल्या असतील. संभा अपनी मौत का जश्न मनाकर चला गया और हमे छोड गया अपनी जिंदगी का मातम मनाने महाराष्ट्रातल्या मराठी बांधवानी आपल्या कुटुंबासह हा चित्रपट का पाहावा तर या चित्रपटाने मराठी माणसांची आणि महाराष्ट्राच्या इतिहासाची पुनर्बांधणी केली आहे. हा चित्रपट देशभरच्या तरुणांना प्रेरणा देणार, चेतना आणि देशप्रेम जागविणार. आणि हो .....चित्रपट जरी शेर का छावा म्हणजे शंभुराजे या इतिहासातील व्यक्तिरेखेवर आधारित असला तरी आबासाहेब म्हणजे थोरले छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासाठी लक्ष्मण उतेकरांनी आवाज दिला आहे. संभाजी महाराजांच्या आयुष्यातील अवघड प्रसंगात तो धीर देणारा आश्वासक म्हणून वापरला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची उणीव न भासवता हा आवाज सातत्याने चित्रपट व्यापून जातो आहे. चित्रपटाचे संगीत वेदनादायी आणि परिणामकारकता कसे असू शकते हे ए आर रेहमान यांनी ऐकवले आहे. ङ्गलक्ष्मण उतेकरफ हे नाव आज देशभर प्रेक्षकांच्या तोंडावर आहे. एक नयनरम्य, चित्तथरारक रोमहर्षक प्रेरणादायी अप्रतिम कलाकृती साकारली आहे. छत्रपती संभाजी महाराज यांच्या शौर्यावर, बलिदानावर छावा चित्रपट करून निर्माते, दिग्दर्शक आणि अभिनेते यासर्वांनी अमूल्य असे कार्य केले आहे. त्यांचे मनापासून अभिनंदन! मराठी माणसांनी एकत्र येऊन ...छत्रपती संभाजी महाराजांच्या समर्पणाची गाथा मोठ्या पडद्यावर पाहण्यासाठी प्रत्यक्ष जायला हवे...महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस साहेब, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजितदादांना विनंती आहे की, संभाजी महाराजांचे शौर्य अधिकाधिक लोकांनी पाहावे आणि त्यांच्या बलिदानातून तरुणांनी मोटिव्हेशन घ्यावे यासाठी हा चित्रपट करमुक्त करावा.

रवींद्र मालुसरे
अध्यक्ष
मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई
मो.९३२३११७७०४

# आजची स्त्री अबला नसून सबला-श्रीमती सुरेखा खेडकर


पाटोदा-प्रतिनिधी पाटोदा येथील जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे, कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा यांच्या अंतर्गत तक्रार निवारण (महिला) समितीच्या वतीने दि. १३ फेब्रुवारी २०२५, गुरुवार रोजी कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण-'महिला सुरक्षितता' या विषयावर एक दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांनी केले. या कार्यशाळेचे अध्यक्ष म्हणून प्र. प्राचार्य सोमनाथ घाडगे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्त्या आणि सहशिक्षिका श्रीमती सुरेखा खेडकर, सहशिक्षिका श्रीमती संध्या टेकाळे ह्या होत्या. तर अंतर्गत मुल्यमापन हमी कक्षाचे प्रमुख प्रा. विनोद किर्दक यांची व्यासपीठावर उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांचा सत्कार महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक कार्यशाळेच्या समन्वयक प्रा. ज्योती रकटे यांनी केले. कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण आणि महिला सुरक्षितता राहण्यासाठी वेळोवेळी महाविद्यालयाच्यावतीने अशा कार्यशाळेचे आयोजन करण्यात येते असे त्या म्हणाल्या. कार्यशाळेच्या प्रथम सत्रात कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण आणि कायदे या विषयावर प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्त्या आणि सहशिक्षिका श्रीमती सुरेखा खेडकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. श्रीमती सुरेखा खेडकर म्हणाल्या कि, 'स्त्री जन्मा तुझी कहाणी, ओठी हासू



आणि नयनी पाणी, कर्तृत्व सिद्धता हे स्वप्न मनी, कर्तव्यपूर्ती ठेवी सदा ध्यानी, तरीही मनी एक प्रश्न रुतुनी, स्त्री सुरक्षितता आहे का जनी' आजच्या धकाधकीच्या जीवनात महिलांची सुरक्षितता ही एक गंभीर समस्या बनली आहे. घराबाहेर काम करणाऱ्या महिलांपासून विद्यार्थिनींपर्यंत सर्वच स्तरांवरील महिला विविध धोक्यांना सामोरे जात आहेत. रस्त्यावर, कामाच्या ठिकाणी, ऑनलाईन आणि अगदी घरातही महिलांना छेडछाड, लैंगिक शोषण, हिंसा याचा सामना करावा लागतो. कामाच्या ठिकाणी महिलांची सुरक्षितता सुनिश्चित करणे ही प्रत्येक संस्थेची आणि समाजाची जबाबदारी आहे. त्यासाठी प्रत्येक शाळा, महाविद्यालयात, कामाच्या ठिकाणी 'अंतर्गत तक्रार निवारण (महिला) कक्षाची स्थापना करण्यात यावी. महिलांना सुरक्षित आणि सन्मानपूर्वक काम करण्याचे स्वातंत्र्य मिळावे यासाठी भारतात विविध कायदे आणि नियम लागू करण्यात आले आहेत. कामाच्या ठिकाणी महिलांच्या सुरक्षिततेसाठी भारत सरकारने लैंगिक छळापासून महिलांचे संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम, २०१३ लागू केला आहे. हा कायदा POSH (Prevention of Sexual Harassment) अर्ली म्हणून ओळखला जातो. पोलीस मदत मिळण्यासाठी १००, १०३, १०९१ क्रमांकांच्या हेल्पलाईन जारी करण्यात आल्या आहेत. महिलांवरील अत्याचाराच्या जलद न्यायासाठी, महिलांवरील अत्याचाराच्या गुन्ह्यांसाठी न्यायदान प्रक्रिया जलदगतीने होण्यासाठी कार्यवाही करण्यात येत आहे. त्यासाठी राज्यात २७ विशेष न्यायालये, ८६ जलदगती न्यायालये कार्यरत आहेत. अत्याचार व पोक्सो कायद्यांतर्गत प्रलंबित प्रकरणे चालवून त्वरित निकाली काढण्यासाठी २० पोक्सो व १२ जलदगती न्यायालयांची स्थापना करण्यात अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कायद्यांतर्गत एक विशेष न्यायालयदेखील कार्यरत आहे. हेल्पलाइन आणि सेल्फ डिफेन्स प्रशिक्षण सुरू केले असले तरी अजूनही समाजात मानसिकता बदलण्याची गरज आहे. आजची स्त्री अबला नसून सबला आहे असे त्या म्हणाल्या. त्यानंतर अंतर्गत मुल्यमापन हमी कक्षाचे प्रमुख प्रा. विनोद किर्दक म्हणाले की, -'महिला सुरक्षितता आणि कायदे' यावरती आपले विचार व्यक्त केले. अध्यक्षीय सामारोपात बोलत असताना प्राचार्य सोमनाथ घाडगे म्हणाले की, 'तुझ्या उत्तुंग भरारीपुढे, गगनही ठेंगणे भासावे, तुझ्या विशाल पंखाखाली, विश्व हे सारे वसावे' जगाच्या इतिहासात स्त्रीचा दुर्दम्य आशावाद आणि परिस्थितीशी झुंजण्याच्या अजोड बळाच्या जोरावर आज ती सर्व क्षेत्रात आघाडी वरती आहे. प्रत्येक क्षेत्रात पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून स्त्री उभी आहे. आर्थिक स्वातंत्र्य अनुभवायला शिकली आहे. तिच्या गुणांना, मतांना घरात आणि समाजातही किंमत आहे. विविध क्षेत्रे तिने पादक्रांत केली. स्त्रीची सुरक्षितता हा जरी नाजूक मुद्दा असला तरी आत्मविश्वासाने आज ती व्यक्त होत आहे. काही लोकांच्या वाईट मानसिकतेमुळे संपूर्ण समाजाला त्रास सहन करावा लागतो. त्यासाठी प्रत्येकाने मुलांना लहानपणापासूनच महिलांचा सन्मान करण्याचे शिक्षण दिले पाहिजे. या कार्यशाळेचे सूत्रसंचालन प्रा. डॉ लोखंडे बी. बी. यांनी केले. तर आभार सहशिक्षिका श्रीमती रुपाली मंगरुळे यांनी मानले. या कार्यशाळेला बहुसंख्य महिलांनी प्रतिसाद दिला तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद, विद्यार्थीनिनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला

# निष्कलंक चारित्र्याचे, अजातशत्रू व्यक्तिमत्व ; आर.आर.पाटील

राजकारणातील अजातशत्रू व्यक्तिमत्व अशी ओळख असलेले निष्कलंक चारित्र्याचे माजी उपमख्यमंत्री रावसाहेब राजाराम पाटील उर्फ आर आर पाटील यांचा आज स्मृतिदिन. आजच्याच दिवशी म्हणजे १६ फेब्रुवारी २०१५ रोजी आर आर पाटील यांचे अल्पशा आजाराने निधन झाले होते. आर आर पाटील यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्र हळहळला होता. आर आर पाटील म्हणजे राजकारणातील आम आदमी. शेतकरी असोत की सर्वसामान्य नागरिक, गरीब असोत की वंचित प्रत्येकाला आर आर पाटील आपले वाटत होते. राजकारणात उपमुख्यमंत्री पदासारख्या मोठ्या पदापर्यंत पोहचूनही कायम जमिनीवर राहून जनतेशी नाळ टिकवलेले आर आर पाटील सर्वसामान्यांचे नेते होते म्हणूनच त्यांना सर्वसामान्य नागरिक त्यांना प्रेमाने आबा म्हणत. १६ ऑगस्ट १९५७ रोजी सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील अंजनी गावात एका गरीब शेतकरी कुटुंबात आबांचा जन्म झाला. घरची परिस्थिती गरिबीची असल्याने आबांनी कमवा आणि शिका या योजनेतून शिक्षण घेतले. बी ए झाल्यानंतर त्यांनी एलएलएलबी चे ही शिक्षण घेतले. कॉलेज जीवनातच त्यांनी शेतकऱ्यांचे, सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न शासन दरबारी मांडायला सुरुवात केली. त्यांच्यातील नेतृत्व गुण वसंत दादा पाटलांनी हेरले आणि त्यांना राजकारणात आणले. कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसताना समाजासाठी काहीतरी करण्याची जिद्द, मनाला भिडणारी भाषण शैली आणि स्वच्छ प्रतिमेच्या जोरावर त्यांनी अल्पावधीतच राजकारणात बस्तान बसवले. १९७९ साली पहिल्यांदा जिल्हा परिषद सदस्य म्हणून आबा निवडून आले. १९७९ ते १९९० असे एकवीस वर्ष आबा जिल्हा परिषद सदस्य होते. १९९० साली आबांनी पहिल्यांदा विधानसभेची निवडणूक लढवली आणि प्रचंड मतांनी जिंकली. त्यानंतर २०१४ पर्यंतच्या विधानसभेच्या सर्व निवडणुका आबांनी जिंकल्या. १९९५ साली आबा दुसऱ्यांदा आमदार झाल्यावर राज्यात युतीचे सरकार आले. विरोधी पक्षात असलेल्या आबांनी राजकीय आयुधांचा वापर करून अनेकदा सत्तधाऱ्यांना कोंडीत पकडले. विरोधी पक्षात असूनही आबांनी विधानसभा गाजवून सोडली. १९९९ साली राष्ट्रवादीची स्थापना झाल्यावर ते राष्ट्रवादीत आले.



श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
मो.९९२२५४६२९५

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
सोमवार १७ फेब्रुवारी २०२५
https://lokaarambh.com


# ई-केवायसी साठी उरले १२ दिवस, तर शिधापत्रिकेतून नावे होणार कमी

प्रतिनिधी शिधापत्रिकाधारकांना २८ फेब्रुवारीपर्यंत ई-केवायसी करून घेणे शासनाने बंधनकारक केले आहे. शिधापत्रिकेमधील व्यक्तींची मुदतीत ई-केवायसी न झाल्यास शिधापत्रिकेमधून नाव वगळण्यात येणार तसेच धान्य बंद होणार आहे. त्यामुळे दिलेल्या मुदतीमध्ये ई- केवायसी प्रक्रिया पूर्ण करून घेणे गरजेचे राहणार आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा उपक्रमांतर्गत देशभरात स्वस्त धान्य दुकानांच्या माध्यमातून गरीब नागरिकांना अन्नधान्य पुरविले जाते. त्यासाठी लाभार्थी कुटुंबांना शिधापत्रिकेच्या मदतीने स्वस्त धान्य दुकानांवर अन्नधान्य वाटप केले जाते. दरम्यान, शिधापत्रिकाधारकांनी लवकरात लवकर ई-केवायसी करणे गरजेचे आहे. याची मुदत २८ फेब्रुवारीपर्यंत आहे. मुदतीत ई-केवायसी न केल्यास येत्या १ मार्चपासून संबंधित व्यक्तीचे नाव शिधापत्रिकेमधून कमी होऊन त्यांना धान्य मिळणार नाही. त्यामुळे रेशन धारकांनी आपल्या कुटुंबातील कोणत्या सदस्याची ई-केवायसी झालेली आहे आणि कोणत्या ई-केवायसी झालेली नाही, हे तपासणे गरजेचे आहे. ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी २८ फेब्रुवारीपर्यंत मुदत आहे. त्यामुळे ज्यांनी ही प्रक्रिया अद्याप पूर्ण केलेली नाही, त्यांनी तातडीने करून घ्यायला हवी. अन्यथा ज्यांची ईकेवायसी झाली नाही, त्यांचे नाव शिधापत्रिकेमधून कमी होऊन धान्य पूर्णपणे बंद होणार आहे. तसेच मृत लोकांची नावे शिधापत्रिकेमधून संबंधितांनी कमी करून घेणे बंधनकारक आहे. घरात किती सदस्य आहेत, एखाद्या सदस्याचा मृत्यू झालेला आहे का? या प्रश्नांची उत्तरे मिळण्यासाठी तसेच प्रत्येकाला त्यांच्या हक्काचा शिधा मिळावा यासाठी ही ई- केवायसी केली जात आहे

# पिंपळनेर भागात माघातच जाणवतोय वैशाख वणवा

पिंपळनेर-प्रतिनिधी बीड तालुक्यातील पिंपळनेर सह परिसरात माघ महिन्यातच यावर्षी वैशाख वणवा जाणवू लागलाय. गावचे सरासरी कमाल तापमान ३५ ते ३६ अंशावर गेले आहे. त्यामुळे दुपारी १२ ते ४ पर्यंत गावात, शहरात फिरताना सावधान राहावे, असा इशारा हवामान तज्ज्ञांनी दिलेला आहे. यावर्षी तर जानेवारीच्या शेवटी गावचा पारा ३४ अंशांवर गेला. फेब्रुवारी उजाडताच तो ३५ ते ३६ अंशांवर कायम आहे. यामुळे गावात दुपारी रस्ते ओस पडत आहेत. यावर्षी फेब्रुवारीच्या तिसऱ्या आठवड्यातच तापमान ४० अंशांवर जाईल, असा ही अंदाज हवामानतज्ज्ञांनी वर्तविला आहे. रात्री, पहाटेचा गारवा वाढला असुन कमाल आणि किमान तापमानात अचानक मोठी दरी वाढली आहे. बंगालच्या उपसागरातून बाष्पयुक्त वारे येत असल्याने रात्री आणि पहाटेचा गारवा पुन्हा वाढला आहे. गावचे कमाल तापमान ३६ ते ३७ अंशांवर, तर किमान तापमान १२ ते १२.५ अंशांवर आहे. त्यामुळे या दोन्ही तापमानात २० अंशांची मोठी दरी तयार झाल्यामुळे पुन्हा आरोग्याच्या तक्रारी वाढत आहेत.

# विश्वकर्मा जयंती शिक्षक कॉलनी येथे उत्साहात साजरी

बीड । प्रतिनिधी दरवर्षी प्रमाणे यंदाही प्रभू विश्वकर्मा जयंती गेवराई शहरात उत्साहात साजरी करण्यात आली. प्रथम प्रभू विश्वकर्मा यांच्या प्रतिमेस राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस माजी आ. अमरसिंह पंडित यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. सर्व समाज बांधवांच्या वतीने उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. जयंती उत्सवासाठी राष्ट्रवादी काँग्रेस तालुका अध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, शहराध्यक्ष दीपक आतकरे, माजी जिल्हा परिषद सदस्य जालिंदर पिसाळ, आवेज सेठ, माजी नगरसेवक रवींद्र बोराडे, संतोष आंधळे, स्वप्निल मोटे, अक्षय पवार, प्रवीण पंडित, प्रताप कुडके, शिवाजी झेंडेकर, अमृत डावकर तसेच पत्रकार अमोल वैद्य, नाना जोशी यांची प्रमुख उपस्थिती आ अमरसिंह पंडित यांनी प्रथम सर्व समाज बांधवांना विश्वकर्मा जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या व प्रास्ताविकातील केलेल्या मागण्याचा नियमाच्या चौकटीत बसून तातडीने पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. सदरील कार्यक्रमासाठी सुरेश पोपळघट, सुभाष आनेराव, ज्ञानेश्वर लाड, रामेश्वर लाड, नंदकुमार पोपळघट, राजेश कळसाईत, सुंदर पिंपळे, हरी आनेराव, हराळ साहेब, गणेश पोपळघट, गोविंद टाकसाळ, नितीन पोपळघट, काकासाहेब पवार, सोनू टाकसाळ, प्रख्यात कवी समाधान सम्राट पखाले, जगताप, हरेर, चव्हाण, गायकवाड सर्वच समाज बांधव भगिनी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



बीड-समाजसुधारक, क्रांतिकारी व बंजारा समाजाचे आद्यगुरु श्री संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त शहरातील संत सेवालाल महाराज चौक येथे उपस्थित राहून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी अभिवादन केले. याठिकाणी आयोजित रक्तदान शिबिरास भेट दिली. यावेळी समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माजलगावचा विक्की दहिवाळ यांची एम.पी. एस.सी.मधून महसूल सहाय्यकपदी निवड

माजलगाव-प्रतिनिधी येथील प्रगतशील शेतकरी व मुद्रांक विक्रेते अशोकराव लोळगे यांचे भाचे विक्की दिनेश दहिवाळ यांची एम. पी. एस. सी. क्रॅक करत महसूल सहाय्यक पदी निवड झाली आहे या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून कौतुक व अभिनंदन होत आहे. विक्की दहिवाळ यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण येथील श्री. सिद्धेश्वर विद्यालय येथे झाले पुर्ण झाले. मोठा भाऊ पुणे येथे असल्याकारणाने विक्की देखील उच्च शिक्षणासाठी पुणे येथील फर्ग्युसन महाविद्यालयात या ठिकाणी कला शाखेत इतिहास विषयात



पदवीचे शिक्षण घेतले महाविद्यालयात असतानाच विक्की ला स्पर्धा परीक्षेचे वेध लागले. पदवीच्या शेवटच्या वर्षी स्पर्धा परीक्षेचा अभ्यास सुरू केला. स्पर्धा परीक्षेच्या प्रथम प्रयत्न ातच एम.पी.एस.सी द्वारे घेण्यात येणाऱ्या पी एस आय पूर्व उत्तीर्ण झालो. परंतु परीक्षेला ०.५० टक्के मार्क कमी पडले आणि माझी संधी हुकली. इथून पुढचा कोव्हिड आल्या कारणाने थांबला. परिक्षेच्या तारखा वारंवार पुढ जाण्याचे सत्र सुरू होत. त्याच्यात मी २ वेळा राज्यसेवेची मुख्य परीक्षा व १ वेळा गट ब ची मुख्य परीक्षा दिली. व मी उत्तीर्ण झालो आणि माझी महसूल सहाय्यक पदी निवड झाली ह्या सर्व प्रवासात मानसिक तणाव हाताळणे हे सर्वात मोठे आवाहन होते. स्पर्धा परीक्षेचं मैदान तोच गाजवू शकतो जो सतत संयमाने कष्ट करत येथे टिकू शकतो असे विक्की दहिवाळ यांनी बोलताना सांगितले. त्याच्या या निवडीबद्दल अच्युतराव लाटे, परमेश्वर बप्पा सोळंके, अशोकराव बुंरगे,राजेश गिल्डा ,अशोक गिराम, राजेश जाधव, अँड इंद्रजीत शिंदे, तुकाराम येवले, शिवाजी कुरे, उमेश मोंगरेकर कमलेश जाब्रस, सचिन टाक, बी. एन. कुलकर्णी, राजेंद्र भिलेगावकर, भालचंद्र पाठक, आनंद डाके, संजोग रुद्रवार, विशाल शिंदे, सचिन कराळे, मयूर आमसुले ,सोमेश घेवारे, विकास दळवी, विशाल शिंदे, राम नरवडे , बालु मामा वाघमारे, दत्ता येवले सिद्धेश्वर येवले महेश येवले समर्थ टाक यांच्या सह सर्व स्तरातून शुभेच्छा चे वर्षा होत आहेत

# कोण कोणाला भेटलं? यावर राजकारण होत असेल तर लोकशाहीमध्ये ते योग्य नाही-देवेंद्र फडणवीस

मुंबई। प्रतिनिधी बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची काही दिवसांपूर्वी हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली. या प्रकरणाचा भाजपाचे आमदार सुरेश धस यांच्यासह अजून काही नेत्यांनी आवाज उठवला. यानंतर या घटनेतील आरोपींना पोलिसांनी अटक केलं. तसेच या संपूर्ण प्रकरणाची चौकशी तीन यंत्रणांच्या माध्यमातून सुरु आहे. दरम्यान, खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराडचे आणि मंत्री धनंजय मुंडे यांचे जवळचे संबंध असल्याचा आरोप विरोधकांनी केला होता. यावरून भाजपाचे नेते सुरेश धस यांनीही अनेकदा टीका केली. पण काही दिवसांपूर्वी सुरेश धस यांनी धनंजय मुंडे यांची त्यांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतल्याची माहिती समोर आल्यामुळे चांगलंच राजकारण तापलं आहे. यावरून राजकीय वर्तुळातून वेगवेगळ्या प्रतिक्रिया समोर आल्या आहेत. यानंतर स्वतः सुरेश धस यांनी या भेटीबद्दल स्पष्टीकरणही दिलं. सुरेश धस यांनी धनंजय मुंडे यांची भेट घेतल्याचे मान्य करत आपण त्यांच्या डोळ्याच्या शस्त्रक्रियेनंतर तब्येतीची विचारपूस करण्यासाठी भेटल्याचं सांगितलं. दरम्यान, सुरेश धस आणि धनंजय मुंडे यांच्या भेटीवर आता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे. कोण कोणाला भेटलं? यावर राजकारण होत असेल तर लोकशाहीमध्ये ते योग्य नाही, असं देवेंद्र फडणवीसांनी म्हटलं आहे. कोण कोणाला भेटलं यावर राजकारण होत असेल तर लोकशाहीमध्ये ते योग्य नाही. लोकशाहीमध्ये संवाद सुरु राहिला पाहिजे. तसेच सुरेश धस यांनी मस्साजोगच्या प्रकरणात खंबीर भूमिका घेतलेली आहे. त्यांची भूमिका सर्वांनी पाहिली आहे. अशा प्रकारे खंबीर भूमिका घेत असताना कोणाशी संवाद तोडून टाकायचा असं करण्याची आवश्यकता नाही. कारण धनंजय मुंडे हे देखील राज्याचे मंत्री आहेत. मग एखादा आमदार एखाद्या मंत्र्यांना भेटला तर कोणताही फरक पडत नाही. तसेच सुरेश धस यांनी देखील सांगितलं आहे की धनंजय मुंडेंची भेट घेतली असली तरी कोणत्याही परिस्थितीत संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना शिक्षा झाली पाहिजे हाच हेतू समोर ठेवून काम करत आहेत. पण काही लोकांना असं वाटतं की सुरेश धस पुढाकार का घेत आहेत? यावरून त्यांच्या पोटात दुखतंय, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. दोन गोष्टी एकत्र केल्या गेल्या. त्यामध्ये एक म्हणजे चंद्रशेखर बावनकुळे यांनी आमच्या दोघांची लावलेली बैठक आणि मी धनंजय मुंडे यांच्या निवासस्थानी त्यांना भेटायला गेलो.

# पळसाच्या पानांच्या पत्रावळी जेवणावळीतून गायब

पिंपळनेर-शिवप्रसाद शिरसाट विवाह सोहळा,धार्मिक सप्ताह, पूजा व धार्मिक कार्यक्रमांत जेवणासाठी मोठ्या प्रमाणात वापरल्या जाणाऱ्या पळसाच्या पानांच्या पत्रावळी सध्याच्या युगात हद्दपार झाल्याचे चित्र बीड तालुक्यातील पिंपळनेर सह ग्रामीण भागात सर्रास दिसू लागले आहे . तर आधुनिकीकरणाच्या युगात प्लास्टिक व थर्माकोलच्या पत्रावळींना समाजात अधिक पसंती मिळत आहे. विवाह सोहळ्यात व इतर धार्मिक कार्यक्रमांत पळसाच्या पानाच्या पत्रावळींची जागा थर्माकोल व प्लास्टिक पत्रावळीने घेतली आहे. त्यामुळे स्थानिकांचे पत्रावळी तयार करणे व पळसाची पाने शेतातून, जंगलातून आणून व्यापाऱ्यांना विकणे, असा छोटेखानी रोजगार देणारा व्यवसाय हा मागणी कमी होत असल्याने जवळजवळ बंद झाला आहे. पुरातन काळापासून मंगलकार्याच्या जेवण समारंभासाठी पळसाच्या पानांपासून बनवलेल्या पत्रावळींचा वापर केला जात असे. आयुर्वेदीय गुणधर्म असलेली पळसाच्या पानाची पत्रावळी सध्या लोप पावत आहे. शहरातील पानटपरीवालेही सध्या पार्सल मावा पळसाच्या पानात बांधून न देता आता कागद किंवा प्लास्टिकमध्ये बांधून देत असल्याने पळसाच्या पानांची मागणी आपोआप घटली आहे. परिणामी, जंगल परिसरातील स्थानिकांचा रोजगाराचे साधन असलेला हा व्यवसाय बंद झाल्याचे स्थिती आहे. पळसाच्या पानांची पत्रावळी शिवण्यासाठी लिंबाड्याच्या झाडाच्या काडीचा वापर होत असतो. लिंबाड्याच्या झाडाला आयुर्वेदात मोठे महत्त्व प्राप्त आहे. पळसाच्या पानांना कीड लागत नाही. या पत्रावळी स्वस्तात सहज उपलब्ध होत होत्या. पूर्वी पळसाच्या पानांनी बनविलेल्या पत्रावळीत जेवणाचा स्वाद अलगच असायचा. असे जुनेजाणते वयोवृद्ध नागरिक आजही अभिमानाने सांगत आहेत.

# लिंबारूई येथे गुरूवारपासून अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

नवगण राजुरी-प्रतिनिधी येथून जवळच असलेल्या श्री क्षेत्र संगमेश्वर देवस्थान लिंबारूई येथे शिवस्वरूप संत नारायणदेव बाबा वाकीकर यांच्या कृपाशिर्वादाने आणि शिवउपासक बालयोगी श्री संत भगवान बाबाजी यांच्या मार्गदर्शनाखाली दि.२० ते दि.२७ फेब्रुवारी या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहातील दैनिक कार्यक्रमात पहाटे ४ ते ६ काकडा, सकाळी ६ ते ७ विष्णू सहस्त्रनाम, ७ ते १० ज्ञानेश्वरी पारायण, १० ते १२ संत तुकाराम महाराज गाथा भजन, दुपारी १ ते ४ संगीत भागवत कथा, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ, रात्री ८ ते १० हरिकिर्तन होणार असुन यात ह.भ.प.गुरूवर्य महंत प्रेममुर्ती शिवाजी महाराज श्री क्षेत्र संस्थान नारायणगड, ह.भ.प.विक्रम महाराज सारूक, ह.भ.प.अक्षय महाराज पिंगळे रविवार दि.२३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५.३० महाराष्ट्रातील समाजप्रबोधनकार ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख (इंदुरीकर), ह.भ.प.मोहन महाराज रेंगे, ह.भ.प.पांडुरंग महाराज जाधव, ह.भ.प.रामानंद महाराज भारती यांचे किर्तन होणार आहे. या सप्ताहाची सांगता गुरूवार दि.२७ फेब्रुवारी रोजी दुपारी ११ ते १ यावेळेत ह.भ.प.लक्ष्मण महाराज मेंगडे बंकटस्वामी संस्थान नेकनूर यांच्या काल्याच्या किर्तनाने होईल. त्यांनतर महाप्रसाद होईल तरी या सप्ताहाचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन समस्त ग्रामस्थ मंडळअसे आवाहन समस्त ग्रामस्थ मंडळ लिंबारूई यांनी केले आहे.

# बीडच्या पाणीपुरवठ्याप्रश्नी आ.संदीप क्षीरसागरांकडून पुन्हा अजितदादांची भेट

जुन्नर दि.१६ (प्रतिनिधी):- बीड शहराच्या सुरळीत पाणीपुरवठ्यासाठी आ.संदीप क्षीरसागर गेल्या अनेक दिवसांपासून सातत्याने पाठपुरावा करत आहेत. आताही रविवारी (दि.१६) रोजी जुन्नर येथे आ.संदीप क्षीरसागर यांनी दुसर्यांदा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांची याच संदर्भात भेट घेतली. बीड शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी अमृत अटल योजना आणि बिंदुसरा धरण आणि



माजलगाव बॅकवॉटरमध्ये पाण्याची पुरेशी उपलब्धता आहे. मात्र नगरपालिकेकडे महावितरण कंपनीचे ३६ कोटी रुपयांचे वीजबिल थकलेले आहे. त्यामुळे अमृत अटल पाणीपुरवठा योजनेसाठी आवश्यक असलेले नवीन वीज कनेक्शन देण्यात येत नसल्याने पाणी उपलब्ध असताना देखील बीड शहराला पाणी मिळत नाही. याबाबत आ.संदीप क्षीरसागर यांनी गेल्या अनेक दिवसांपासून विधीमंडळ अधिवेशनात, शासनाकडे, प्रशासकीय स्तरावर आणि न्यायालयात देखील हा बीडकरांचा मुलभूत प्रश्न मांडला आहे. सुयोगाने कर्तव्यदक्ष नेते ना.अजित दादा पवार यांच्याकडे बीड जिल्ह्याचे पालकमंत्री पद आले असल्यामुळे आ.संदीप क्षीरसागर याविषयी ना.अजितदादांकडे या विषयात न्याय मागत आहेत. आ.क्षीरसागर यांनी याच विषयावर दोन आठवड्यांपूर्वी मुंबई येथे ना.अजितदादांची भेट घेतली होती. आता पुन्हा याच विषयावर आ.क्षीरसागरांनी ना.अजितदादांची रविवारी (दि.१६) रोजी जुन्नर येथे भेट घेतली. यावेळी ना.अजित दादा पवार यांनी विद्युत विभागाचे व्यवस्थापकीय संचालक यांना याविषयी तातडीने मार्ग काढण्यासाठी आदेश दिले आहेत. उन्हाळ्याच्या पूर्वी बीड शहराचा पाणीपुरवठा ना.अजितदादांच्या माध्यमातून सुरळीत होईल आणि गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या बीडकरांच्या मुलभूत सोयीसाठी सुरू असलेल्या पाठपुराव्याला यश येईल असा विश्वास आ.संदीप क्षीरसागर यांनी व्यक्त केला आहे.

# भोंदू महिलेने लुंबाडलेले अकरा लाख रुपये ऑनलाईन गेममध्ये घालवले

माजलगावः(प्रतिनिधी) दोन किलो सोन्याचा हंडा (भासवून)घरासमोरील मोकळ्या प्लॉटमध्ये असून तो आपल्या मुलाच्या राशीवर असून त्यामुळे त्याचा घात होऊ शकतो, हे जर थांबायचे असेल तर आपण तीन महिने गावाची शिव ओलांडूनये व घराच्या बाहेर पडू नये अन्यथा आपल्या कुटुंबावर मृत्यूचे सावट येऊ शकते अशी भिती भोंदूमहिला मांत्रिकीने सांगून या कुटुंबाची अकरा लाख रुपयांची आर्थिक फसवणूक केल्यामुळे दिंद्रुड पोलीस ठाण्यात दाखल गुन्हयात पोलिसांनी तपास करत सदरील भोंदू महिला मांत्रीकेस अटक करत तपास केला असता या महिलेने फसवणूक करुन लुबाडलेले लाखो रुपये भोंदू महिलेने ऑनलाईन गेमवर हरले असुन अप्पा-अप्पाचा माल गप्पा-गप्पाला गेला या म्हणीला साजेसा हा प्रकार समोर आलाआहे.सध्या ही महिला बीड येथे न्यायालयीन कोठडीत आहे. थोडक्यात प्रकरण तक्रारारदार संगीता परमेश्वर साखरे, वय ४३ वर्ष, व्यवसाय शेतमजुरी, रा. नित्रुड, ता. माजलगाव, जि. बीड. यांची तक्रार याप्रमाणे माझे पती परमेश्वर, मुलगा सतीश यांचेसह वरील पत्त्यावर राहते व लोकांची शेती बटईने करून उपजीविका भागवते. माझी मुलगी राजकन्या हिचे लग्न झाले असून ती सध्या पुणे येथे तिच्या पती ज्ञानेश्वर यांचेसह असते. साधारण २ वर्षापूर्वी माझे सारखे डोके दुखत असल्याने एका मजूर महिलेने सांगितलेल्या माहितीवरून मी आरती मनोहर गायकवाड, रा. कोळपिंपरी, ता. धारूर, जि. बीड या महिलेकडे तिच्या घरी गेले होते. त्यावेळी मला त्या महिलेने ५ गुरुवार तिच्याकडे वारीसाठी येण्यास सांगितले होते. तिच्या सांगण्याप्रमाणे मी त्यावेळी एकूण ५ गुरुवारी त्या महिलेकडे देवाच्या दर्शनासाठी वारीकरिता गेले. त्यावेळी मला तिचा गुण येऊन माझे डोके दुखणे बंद झाल्याने मला त्या महिलेवर विश्वास बसला, त्यानंतर सप्टेंबर २०२४ मध्ये माझे पुन्हा डोके दुखू लागल्याने मी पुन्हा डॉक्टर कडे न जाता माझा मुलगा सतीश याचेसोबत आरती गायकवाड हिच्याकडे कोळपिंपरी येथे गेले. त्यावेळी तिने मला तीन गुरुवारी तिच्या घरी येऊन देवाच्या वाऱ्या करण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी तिच्या घरी माझ्या मुलासह तीन गुरुवार जाऊन देवदर्शन घेतले. त्या वाऱ्या झाल्यानंतर दि.२७/०९/२०२४ रोजी मी माझ्या मुलाचा मोबाईल क्रमांक तिला दिलेला असल्याने तिचा आम्हाला फोन आला व तिने मला अर्जट तिच्या घरी पती व मुलासह येण्यासाठी सांगितले. त्यावेळी आम्ही तिच्याकडे कोळपिंपरी येथे गेलो असता तिने आम्हाला सांगितले कि, तुमच्या घरासमोरील मोकळ्या प्लॉट मध्ये जमिनीत २ किलो सोन्याच्या बिस्किटाचा हंडा असून तो तुमचा मुलगा सतीश याच्या राशीवर आहे. ते सोने जर तुम्ही नाही काढले तर तुमच्या मुलाचा घात होईल नाहीतर तुमच्या तिघांपैकी कोणीतरी मरून जाईल. त्यानंतर आम्ही घाबरून गेलो व ते न होण्यासाठी काय करावे लागेल असे तिला विचारले. त्यावर तिने बाहेरून बाबा आणून पूजा, होम हवन करून ते सोने काढावे लागेल व त्यासाठी ६ ते साडेसहा लाख रुपयांचा खर्च आहे असे सांगितले. एवढा खर्च असल्याने मी तिला आमची ऐपत नसल्याचे सांगून ते सोने काढण्यास नकार दिला, परंतु तिने आम्हाला आमचा मुलगा सतीश याच्या तसेच आमच्या जीवाची भीती घालून ते सोने काढण्यास तयार केले. त्यानंतर तिचे आणि आमचे फोन वरून ते सोने काढण्यासाठी संभाषण होत होते. आम्ही आमच्या घरी तिने जसे सांगेल त्याप्रमाणे होम हवन पूजा करत होतो. ती आम्हाला फोनद्वारे,ुहर्रीर्रिविरून पूजा होम हवन कस करायचं ते सांगत होती त्याप्रमाणे आम्ही सर्व क्रियाविधी करत होतो. तिने आम्हाला सोन्याचा हांडा काढेपर्यंत शिव ओलांडायची नाही व घराच्या बाहेर न जाता दार बंद करुन बसायचे असे सागितल्याने आम्ही तिन महिने घराच्या बाहेर पडत नव्हतो तो सोन्याचा हंडा(भासवून) काढण्यासाठी तिने आमच्याकडून वेगवेगळ्या कारणासाठी वेळोवेळी पैश्यांची मागणी केली व त्याप्रमाणे आम्ही आमच्या मुलाच्या जीवाच्या भीतीने तिला वेगवेगळ्या मार्गाने वेळोवेळी पैसे देत गेलो.

# माजलगावात आढळला अनोळखी इसमाचा मृतदेह



माजलगावः प्रतिनिधी माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत रविवारी (दि.१६) रोजी सकाळी ११ वाजता सोमठाणा शिवार येथे गोदावरी नदीपात्रात ढालेगाव बंधाऱ्या जवळ एका ३० ते ३५ वर्ष वयाच्या पुरूषाचा मृतदेह आढळला आहे. सदर प्रेताचे अंगावर पांढऱ्या रंगाचे टी शर्ट व काळ्या रंगाची जीन्स पँन्ट आहे व कंभरे भोवती लाल रंगाचा करदुडा बांधलेला आहे. प्रेत गोदावरी नदीपात्रातून काढून माजलगाव ग्रामीण रुग्णालय येथे ठेवण्यात आले आहे. तरी पोलीस ओळख पटविण्याचा प्रयत्न करीत आहोत.सदर इसबाबाबत कोणास काही माहिति किंवा कोणी ओळखीत असल्यास पोलिसांशी संपर्क साधावा असे आवाहन पोलिसांनी केले आहे. पोलीस निरीक्षक श्री कोळी ९४२३६६८९२२, ९२२५०९२८३०, स पोलीस निरीक्षक श्री सोनवळे ८९७५१२०१७७ या नंबरवर संपर्क साधावा.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर

सोमवार १७ फेब्रुवारी २०२५
https://lokaarambh.com



## शेगावला असोसिएशन ऑफ स्मॉल अँड मिडीयम न्यूज पेपर संघटनेचे राज्यस्तरीय अधिवेशन

माजलगाव-प्रतिनिधी असोसिएशन ऑफ स्मॉल अँड मिडीयम न्यूज पेपर ऑफ इंडिया महाराष्ट्र प्रदेश या संघटनेचे राज्यस्तरीय अधिवेशन बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव येथे सोमवार दिनांक १७ फेब्रुवारी २०२५ रोजी आयोजित करण्यात आले असल्याची माहिती संघटनेचे राज्य या संघटनेचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष प्रदीप कुलकर्णी यांनी येथे बोलताना दिली आहे. याबाबत अधिक माहिती सांगताना ते म्हणाले की स्मॉल अँड रेडियम न्यूज पेपर ऑफ इंडिया संघटना राष्ट्रीय पातळीवरील संघटना असून राष्ट्रीय अध्यक्ष माननीय के डी. चंडोला व राष्ट्रीय महासचिव शंकर कटिरा यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रात ही छोट्या आणि मध्यम वृत्तपत्रांच्या समस्या आणि अडचणी सोडवण्यासाठी भरीव काम करीत आहे. याच अनुषंगाने छोट्या आणि मध्यम वृत्तपत्रांच्या विविध समस्यांच्या संदर्भात हे अधिवेशन आयोजित करण्यात आले असून या अधिवेशनाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे खाजगी सचिव विद्याधर महाले यांच्या शुभहस्ते करण्यात येणार आहे. या अधिवेशनासाठी प्रमुख पाहुणे म्हणून बुलढाणा अर्बन चे अध्यक्ष माननीय सुकेश जी झंवर हे उपस्थित राहणार आहेत. तर या अधिवेशनाचे अध्यक्ष स्थान संघटनेचे राज्य अध्यक्षस्थान संघटनेचे राज्य अध्यक्ष प्रदीप कुलकर्णी हे भूषवणार असून संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष माननीय आप्पासाहेब पाटील, संघटनेचे राष्ट्रीय सचिव माननीय प्रवीण पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये हे अधिवेशन संपन्न होणार आहे. या अधिवेशनाचे उद्घाटन दुपारी १२ वाजून १५ मिनिटांनी होणार असून हे अधिवेशन शासकीय विश्रामगृह शेगाव जिल्हा बुलढाणा येथे संपन्न होणार आहे. एक दिवशीय अधिवेशनामध्ये संघटनेच्या कार्याचा लेखाजोखा मांडण्यात येणार असून सभासद वाढीसाठी विविध भागातील पदाधिकाऱ्यांनी काय प्रयत्न केले? याबाबतची माहिती जाणून घेण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे छोट्या आणि मध्यम वृत्तपत्रांच्या ज्या समस्या आहेत, आणि अडचणी आहेत, ज्या शासनाकडे मागण्या करावयाच्या आहेत, ज्या मागण्या मंजूर झाल्या आहेत, ज्या प्रलंबित आहेत त्या सर्वांवर या अधिवेशनामध्ये सविस्तर अशी चर्चा केली जाणार आहे.

# बार्शी नाका इमामपूर रोड रेल्वे स्टेशनसाठी होणार सर्वेक्षण

## खा.बजरंग सोनवणेंनी दिला शब्द राखला; रेल्वेमंत्र्यांकडून तातडीने दखल



बीड : अहल्यिानगर-बीड रेल्वेची जलदगती चाचणी झाली असून बार्शी नाका इमामपूर रोड परिसरात रेल्वेला थांबा देण्यात यावा, अशी रेल्वे कृती समितीने दि.२५ जानेवारी २०२५ रोजी खा.बजरंग सोनवणे यांच्याकडे केली होती. यावेळी खा.सोनवणे यांनी मतुम्ही चिंता सोडा, बार्शी नाका येथे रेल्वे थांबा मंजूर करून घेतो, असा शब्द दिला होता. हाच शब्द राखत खा.सोनवणे यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री यांची भेट घेतली. यानंतर बार्शीनाका ( इमामपूर रोड) रेल्वे स्टेशनसाठी तातडीने सर्व्हेक्षण करावे, असे नर्दिश केंद्रीय मंत्र्यांनी रेल्वे विभागाला दिले आहेत. रेल्वे हा बीडच्या जव्हिाळ्याचा विषय आहे. लोकसभा निवडणूक झाल्यानंतर खा.बजरंग सोनवणे यांनी पहिली बैठक रेल्वे विभागाची घेवून बीडला रेल्वे आणण्यासाठी कालावधी ठरवून दिला. पहिला टप्पा अंमळनेर ते विघनवाडी, विघनवाडी ते नवगण राजुरी असे दोन टप्पे पुर्ण केले. आता बीडपर्यंत जलदगती रेल्वेची चाचणी देखील झाली असून आहे. सद्यस्थितीत पालवण परिसरात रेल्वे स्टेशन झालेले असून बार्शी नाका परिसरातील नागरिकांना हे गैरसोयीचे होत असल्याचे बीड रेल्वे कृती समितीचे मत आहे. कृती समितीने खा.बजरंग सोनवणे यांच्यासोबत दि.२५जानेवारी रोजी बैठक आयोजीत केली होती. यावेळी कृती समितीने रेल्वेबाबतच्या मागण्याच्या निवेदन खा.सोनवणे यांना दिले होते. यावेळी बोलताना खा.बजरंग सोनवणे यांनी बार्शी नाका परिसरात रेल्वे थांबा देण्याबाबत आपण प्रयत्न करू, तो विषय माझ्यावर सोडा, असा वश्विास दिला होता. अवघ्या १७ दिवसात या विषयाला गती देण्यात आलेली आहे. कृती समितीला शब्द दल्यिानंतर खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची दल्लिीत भेट घेवून पत्र दिले होते. यानूसार आता केंद्रीय मंत्र्यांनी रेल्वे विभागाला रेल्वेस्टेशनच्या बाबतीत सर्व्हेक्षण करण्याचे नर्दिश दिले असल्याचे दि. १२ फेब्रुवारीच्या पत्रान्वये रेल्वेमंत्री यांनी खा. सोनवणे यांना कळविले आहे. एकूणच, खा.बजरंग सोनवणे यांनी दिलेला शब्द राखण्यासाठी प्रयत्नवादी आहेत. येणाऱ्या काळात हा विषय मार्गी लागणार आहे.

# आ.सुरेश धसांच्या पुढाकारातून उभा रहाणारा शिवरायांचा अश्वारूढ पुतळा

कामदार आमदार म्हणून ओळख असलेले सुरेश धस यांच्या पुढाकारातून पाटोदा शहराच्या छत्रपती शिवाजी महाराज चौकात लवकरच शिवरायांचा अश्वारूढ पुतळा उभा रहाणार असून, याची पाहाणी करण्यात आली आहे. यामुळे पाटोदा शहराच्या वैभवात भर पडणार असून, अनेक वर्षांपासूनचे शिवप्रेमींचे स्वप्न साकार होणार असल्याने आनंद व्यक्त करीत आ. सुरेश धस यांनी पुढाकार घेतल्याने त्यांचे आभार मानले जात आहे. आष्टी विधानसभा मतदारसंघातील तालुका असलेल्या पाटोदा शहरातील



छत्रपती शिवाजी महाराज चौकात तमाम देशाची अस्मिता आणि आदर्श असणारे सर्व जाती धर्मातील जनतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा असावा अशी इच्छा आहे. परंतु यासाठी अनेक परवानग्या घ्याव्या लागत असल्याने हे किचकट काम सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेर आहे. त्यामुळे यासाठी लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेणे अपेक्षित असते, पण त्यांना यासाठी वेळ कुठे असतो असा प्रश्न काही मागील अनुभव पहाता म्हणता येईल. परंतु ब्रेक के बाद सुरेश धस हे नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत भरघोस मतांनी विजयी झाले आणि कामदार धस आमदार झाले. आमदार होताच त्यांनी शेतकऱ्यांच्या जीवनात नवी पहाट घेऊन येणारा खुंटेफळ उपसा सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले. नुकतेच याच्या बोगदा कामाचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पार पडले. यामुळे मतदारसंघातील हजारो हेक्टर जमीन ओलिताखाली येणार असून, शेतकऱ्यांच्या घरात आता आर्थिक सुबत्ता येणार आहे. हा ड्रीम प्रोजेक्टचा म्हत्वाचा टप्पा गाठताच पाटोदा येथील ड्रीम प्रोजेक्टला हात घातला आहे. येथील जनतेचे स्वप्न साकार करण्यासाठी त्यांनी पुढाकार घेऊन येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा उभारण्याचा निर्णय घेतला आहे. हा पुतळा बनविण्यासाठी प्रसिद्ध मुर्तीकार यांची निवड केली आहे. याचा डेमो त्यांनी दाखविला आहे. तर काल आ. सुरेश धस, नगराध्यक्ष, मुर्तीकार, नागरिक यांनी पुतळा जागेची पहाणी केली आहे. यामुळे येत्या काही दिवसांतच पाटोदा येथील चौकात पुतळा दिसणार असल्याने यामुळे शहराच्या वैभवात भर पडणार आहे. यामुळे पाटोद शहरासह तालुक्यातील शिवप्रेमी मध्ये आनंदाचे वातावरण पसरले

## शिवजन्मोत्सवात महिलांनी सक्रिय सहभाग घ्यावा



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : मराठा सेवा संघ नांदेड आयोजित शिवजन्मोत्सवा निमित्ताने जिजाऊ ब्रिगेडच्या वतीने कॉर्नर बैठक मोरया हाइट्स सोसायटी (अपार्टमेंट) शारदा नगर नांदेड येथे शिवमती अर्चना राधाकृष्ण होगे व शिवमती सुनिता नानाराव कल्याणकर यांच्या पुढाकाराने घेण्यात आली.

बैठकीच्या प्रारंभी राष्ट्रमाता राजमाता माँ.साहेब जिजाऊ कुळवाडी भूषण छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले व जिजाऊ वंदनेने बैठकीला सुरुवात करण्यात आली.

जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेश प्रवक्ता डॉ.भारतीताई मडवई यांनी महिलांना शिवजन्मोत्सवा निमित्ताने घेण्यात येणा-या कार्यक्रमाची रूपरेषा सांगून उपस्थित महिलांना सविस्तर मार्गदर्शन केले. तर शिवजन्मोत्सव समितीचे अध्यक्ष अँड.बालाजी वाघमारे स्वागताध्यक्ष पंडितराव कदम यांनी शिवजन्मोत्सवाच्या भव्य मिरवणुकीमध्ये सहभागी होऊन महिलांनी सक्रिय सहभाग घ्यावा असे आवाहन केले. यावेळी मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष अँड.सतीशकुमार जाधव ,एन. जी.कल्याणकर ,डॉ राधकृष्ण होगे जिजाऊ ब्रिगेडच्या विभागीय अध्यक्षा डॉ.विद्याताई पाटील जिल्हाध्यक्षा कल्पनाताई चव्हाण, सुमित्राताई वडजकर, डॉ. सत्यभामा जाधव,राणीताई दळवी यांची उपस्थिती होती.

बैठकीचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन अर्चना होगे यांनी केले तर सर्वांचे आभार सुनिता कल्याणकर यांनी मानले.

# गुरुदत्त विद्यालय चौसाळा येथे इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा शुभचिंतन सोहळा संपन्न

चौसाळा : गुरुदत्त माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय चौसाळा येथे इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यासाठी आयोजित केलेल्या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून चौसाळा चौकीचे जमादार आदरणीय खटाने साहेब व प्रमुख पाहुणे म्हणून पोलिस अधिकारी श्री मुरुमकर साहेब. तसेच संस्थेचे उपाध्यक्ष सयाजी (बाप्पा) शिंदे, शालेय समितीचे सदस्य संभाजी आबा जोगदंड,उमेश आंधळे, सामाजिक कार्यकर्ते शीकुर भाई सौदागर यांच्यासह विद्यार्थी पालक व शिक्षक वृंदाच्या उपस्थितीत संपन्न झाला. सर्व मान्यवरांच्या हस्ते सरस्वती प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. इयत्ता



दहावीच्या विद्यार्थ्यांच्या वतीने शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांचा सत्कार करण्यात आला विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सुमित जाधव याने शाळेतील गोड आठवणी व शिक्षकांचे मार्गदर्शन याबाबत मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री खाटणे साहेब यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असताना समाजात आजची तरुण पिढी भरकटत चालली आहे यावर प्रकाश टाकून विद्यार्थ्यांनी व्यसनांपासून दूर राहून समाजात सर्व धर्म समभाव व जातीय सलोखा राखण्याचे आवाहन केले. शाळेतील शिक्षक श्री.लीमकर यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धेचे युगात टिकायचे असेल तर जिद्द आणि चिकाटी हवी अशी अपेक्षा व्यक्त केली. विद्यार्थी प्रिय शिक्षक श्री गुरव सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना स्वतःच्या करिअरचा विचार करत असतानाच समाजाचे व आपल्या आई-वडिलांचे ही ऋण आपल्यावर आहे याची जाण ठेवण्याबाबत सल्ला विद्यार्थ्यांना दिला

# सामान्य जनतेत काम करणाऱ्यांना पक्ष संघटनेत प्राधान्य देवू-अमरसिंह पंडित

## अजित पवार राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण यांच्या उपस्थितीत गेवराईत सदस्य नोंदणीचा शुभारंभ

गेवराई-प्रतिनिधी विधानसभेतील विजयामुळे कार्य पद्धतीत बदल होणार नाही, भविष्यातही जमीनीवर राहुन काम करत राहु, राजकीय गट-तट न पाहता सर्वसमावेशक विकास कामे करुन सामान्यांना दिलासा देण्याचे काम आपण सर्वांनी करणे गरजेचे आहे. पक्ष संघटनेतील पदाधिकाऱ्यांची निवड करताना सामान्य जनतेत काम करणाऱ्यांना पक्ष संघटनेत प्राधान्य देवून असे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांनी सांगितले. मराठवाडा विभागात सर्वाधिक सदस्य नोंदणी गेवराई मध्ये होईल असा विश्वास जिल्हाध्यक्ष अॅड. राजेश्वर चव्हाण यांनी व्यक्त केला. गेवराई येथे आयोजित सदस्य नोंदणी अभियान व पदाधिकारी मेळाव्यात ते बोलत होते. आमदार म्हणुन पहिल्या शंभर दिवसात आ.विजयसिंह पंडित यांनी केलेल्या कामांचा लेखा-जोखा यावेळी अमरसिंह पंडित यांनी उपस्थितांसमोर मांडला. मेळाव्याला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते हजारोंच्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने सदस्य नोंदणी अभियान व पदाधिकारी मेळाव्याचे गेवराई येथे शनिवार दि. १५ रोजी आयोजन करण्यात आले होते. यावेळी राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित, जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, जयभवानीचे व्हा. चेअरमन भाऊसाहेब नाटकर, बाजार समितीचे सभापती मुजीब पठाण, खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष जयदिप औटी, बीड बाजार समितीचे उपसभापती शामराव पडुळे, जिल्हा बँकेचे माजी संचालक दशरथ वनवे, सरपंच संघटनेचे कालिदास नवले, माजलगांव चे माजी सभापती भागवत खुळे, भवानी बँकेचे व्हा. चेअरमन अब्दुल हन्नान, आनंद सरपते, शितलताई धोंडरे, मुक्ताताई आर्दड यांच्यासह मान्यवर व्यासपिठावर उपस्थित होते. या प्रसंगी भाऊसाहेब नाटकर यांनी प्रास्ताविक केले तर गजानन काळे, गणेश सावंत, कालिदास नवले, समीर सय्यद, आनंद सरपते यांनी मनोगत व्यक्त केले. आ. विजयसिंह पंडित यांनी आमदार म्हणुन पहिल्या शंभर दिवसात पी.एम. किसान योजनेतील ३,१०० लाभार्थ्यांना लाभ मिळवुन दिला, २२,१८० एपीएल शिधापत्रिका धारकांना



२ कोटी ७८ लाख रुपयांचा लाभ मिळवुन दिला. दिव्यांगांसाठी प्रत्येक महिण्याच्या पहिल्या शनिवारी एक दिवसाचे दिव्यांग बोर्ड उपजिल्हा रुग्णालय, गेवराई येथे आयोजित करण्याचा निर्णय केला. उपजिल्हा रुग्णालयात डायलेसिस युनिट, एक्सरे आणि सोनोग्राफी मशिन कार्यान्वीत केल्या. पी.एम. कुसूम योजनेतील प्रलंबित १३० सौर कृषीपंप अस्थापित करुन दिले. गेवराई आगारासाठी नविन बसेस, सिंदफणा नदीवरील टाकळगांव बॅरेज, न्यायालयाच्या विस्तारित इमारत बांधकामासाठी पाठपुरावा, गेवराई शहरातील पाणी पुरवठा योजना आणि रुग्णलयासाठी एक्सप्रेस फिडर, अतिक्रमण धारकांचा हक्काचा पीटीआर आदी विकास कामे करण्यासाठी पाठपुरावा सुरु केल्याबाबतचा लेखा-जोखा माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी यावेळी उपस्थितांसमोर मांडला. सर्वसामान्य जनतेत जावुन काम करणाऱ्यांना पक्ष संघटनेतील पदे देतांना प्राधान्य मिळेल, सर्वांना विश्वासात घेवुन काम करणाऱ्यांना संधी देवु, विकास कामांसाठी निधी वितरीत करतांना ग्रामपंचायतीला विश्वासात घेवु, पक्ष संघटना अधिक मजबुत करण्यासाठी सर्वांनी पुढे येवुन काम करण्याची गरज आहे. पक्षात नव्याने आलेल्या कार्यकर्त्यांचा सुद्धा सन्मान होईल असा विश्वास या निमित्ताने प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांनी व्यक्त केला. सदस्य नोंदणी अभियान केवळ सदस्य वाढीपुरते मर्यादित न राहता भविष्यात सक्षम नेतृत्व घडविण्यासाठी आणि जनसामान्यांपर्यंत पक्षाच्या धोरणांचा प्रचार करण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com